# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी -४ महाराष्ट्र विपीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनिम क्रमांक (६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (महाविद्यालयीन व विद्यापीठ विकास विभाग)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली ४४२६०५

फोन /फॅक्स नंबर ०७१३२ - २२३१०४ | Email-gug.registrar@gmail.com


गो.वि./मविविवि/ 1674 /२०२३ | दिनांक :१२/१०/२०२३

## परिपत्रक

**विषय :- दिनांक १४ ऑक्टोबर २०२३ रोजी आयोजित 'वॉक फॉर फ्रिडम' या उपक्रमात सहभाग घेण्याबाबत.**

**संदर्भ :- जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली यांचे पत्र क्र. /जिविसेप्रा/१७०४/२०२३, दिनांक ०५/१०/२०२३**

विद्यापीठाशी संलग्नित गडचिरोली शहरातील सर्व महाविद्यालय, विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई, यांचे निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व 'व्हिजन रेस्क्यु' यांच्या संयुक्त विद्यमाने मानव तस्करी विरोधात जनजागृतीसाठी दिनांक १४/१०/२०२३ रोजी महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्हयात 'वॉक फॉर फ्रिडम' ही पदयात्रा आयोजित करण्यात येणार आहे.

गडचिरोली जिल्हा मुख्यालयात देखील दिनांक १४ ऑक्टोबर, २०२३ रोजी सकाळी ०७ .०० ते ९.०० या वेळेत पदयात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. जिल्हा न्यायालयापासून आय.टी.आय. चौकापर्यंत व तेथून एल.आय.सी. चौकापासून परत जिल्हा न्यायालय असा या पदयात्रेचा मार्ग असेल.

त्याअनुषंगाने सदर रॅली मध्ये आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी, एन.एस.एस. आणि एन.सी.सी.चे सीनीयर कॅडेट्स, प्राध्यापक यांनी या पदयात्रेत सहभागी होवून प्रशासनास सहकार्य करावे, हि विनंती.

**सहपत्र : संदर्भीय पत्र**

डॉ. अनिल हिरेखण
कुलसचिव,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी,

१) मा. कुलगुरु महोदय, यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२) मा. प्र-कुलगरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३) मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४) मा. विभागप्रमुख, सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
५) मा. प्राचार्य, गडचिरोली शहरातील सर्व संलग्नित महाविद्यालय.

आवक क्रमांक /जिविसेप्रा/ /२०२३
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली
दिनांक - ०५/१०/२०२३

प्रति,

मा.प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

<u>विषय</u> - दिनांक १४ ऑक्टोंबर २०२३ रोजी आयोजित 'वॉक फॉर फ्रिडम' या उपक्रमात सहभाग घेण्याबाबत...

<u>संदर्भ</u> - मा.महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई, यांचे ईमेल पत्र क्र. २०२३/१७४२, दिनांक - १७/०६/२०२३.

मा.महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने आपणास सविनय सादर करण्यात येते की, मा.महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्रांधिकरण व 'व्हिजन रेस्क्यु' यांच्या संयुक्त विद्यमाने मानव तस्करी विरोधात जनजागृतीसाठी दिनांक १४/१०/२०२३ रोजी महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्हयात 'वॉक फॉर फ्रिडम' ही पदयात्रा आयोजित करण्यात येणार आहे.

गडचिरोली जिल्हा मुख्यालयात देखील दिनांक १४ ऑक्टोंबर २०२३ रोजी सकाळी ०७.०० ते ९.०० या वेळेत पदयात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. जिल्हा न्यायालयापासून आय.टी.आय. चौकापर्यंत व तेथून एल.आय.सी. चौकापासून परत जिल्हा न्यायालय असा या पदयात्रेचा मार्ग असेल.

त्याअनुषंगाने सदर रॅलीमध्ये आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी, एन.एन.एस. आणि एन.सी.सी.चे सीनीयर कॅडेट्स, प्राध्यापक यांना या पदयात्रेत सहभागी होण्याची सुचना देण्यात यावी. तसेच आपण या रॅलीत सहभागी होऊन या कार्यालयास सहकार्य करावे हि विनंती.

आपला विश्वासू,

(आर.आर.पाटील)
सचिव
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
तथा
दिवाणी न्यायाधिश(व.स्तर)
गडचिरोली

प्रत : श्री.भुषण तोंडरे, व्हिजन रेस्क्यु, मुंबई.